लोकमत

'स. प.' तील विद्यार्थ्यांची 'क्लब ऑफिसर'पदी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सर परशुरामभाऊ (एस. पी.) महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांची 'क्लब ऑफिसर' म्हणून निवड करण्यात आली आहे. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या विशेष उपक्रमांतर्गत स. प. महाविद्यालय आणि 'क्विक हील फाउंडेशन' यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत ही निवड झाली आहे. यात निवड झालेले चार मुख्य क्लब ऑफिसर्स आणि त्यांच्या सोबतीला असलेले १६ सायबर वॉरियर्स असे एकूण २० विद्यार्थी या जनजागृती अभियानात योगदान देणार आहेत.

या महत्त्वपूर्ण मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये अवंती दळवी (प्रेसिडेंट), ईशा जोशी (सेक्रेटरी), चिन्मय शेवाडे (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर) आणि अन्वय आल्हाट (मीडिया डायरेक्टर) यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या संपूर्ण उपक्रमाचे योग्य नियोजन आणि समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी महाविद्यालयातील प्रा. कीर्ती गरूड यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

याप्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

एकूण २० विद्यार्थ्यांना संधी

ऑफलाईन प्रशिक्षण

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे नुकतेच विमाननगर येथील क्विक हील फाउंडेशनच्या कॉर्पोरेट कार्यालयात अतिशय दर्जेदार ऑफलाइन प्रशिक्षण आणि ओरिएंटेशन सत्र पार पडले.

सायबर सुरक्षेचे गिरवले धडे

या सत्रादरम्यान फाउंडेशनचे तज्ज्ञ मार्गदर्शक अजय शिर्के, गायत्री केसरकर-पवार, दीपूसिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशिक्षणार्थींना सायबर सुरक्षेचे आधुनिक पैलू, तंत्रज्ञान आणि जनजागृतीच्या विविध पद्धतींचे सखोल मार्गदर्शन केले.